Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-1 | Feb-2015
Available online at www.isrj.org

# स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक तत्वज्ञान

**संध्या जाधव**

मराठी विभाग, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड.

## प्रस्तावना :

व्यक्तीच्या अंगी असणा-या उपजत आणि सुप्त प्रवृत्ती जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून शक्य होते. शिक्षणाने व्यक्तीचा सर्वांगिण विकास घडवून त्याला जबाबदार नागरीक बनविणे हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय आहे. संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू चांगला माणूस निर्माण करणे हा असतो. शिक्षणामध्ये मानवतावादी दृष्टिकोणाचा पुरस्कार करणारे आणि भारतीय धर्म व संस्कृतीची पताका जगभर फडकवणारे स्वामी विवेकानंद हे शिक्षण क्षेत्रातील एक महान विचारवंत म्हणून ओळखले जातात. पारतंत्र्याच्या काळात भारतीय अस्मिता आणि स्वाभिमानाचा दिप प्रज्वलीत करणा-या स्वामी विवेकानंदांच्या शैक्षणिक विचारांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## स्वामी विवेकानंद : परिचय

भारतीय अध्यात्माची ओळख संपूर्ण जगाला करुन देणा-या महान तत्ववेत्याचा जन्म सोमवार दि. १२ जानेवारी १८६३ रोजी कलकत्ता ( कोलकाता ) येथे एका क्षत्रीय कुटुंबात झाला[१] लहानपणी अतिशय खोडकर असलेल्या नरेंद्राचे मुक्त व स्वच्छंदी वातावरणात पालनपोषण झाले. नरेंद्रचे प्राथमिक शिक्षण कलकत्ता येथील मेट्रोपॉलिटन शाळेत झाले. १८८५ साली त्यांनी पदवी परिक्षा पास केली होती. आपल्या तीव्र स्मरणशक्तीच्या बळावर त्यांनी शैक्षणिक जीवनात मोठी कीर्ती संपादन केली होती. स्पेन्सर, कांट, हेगेल, मिल प्रभृती इत्यादी तत्वज्ञांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता.

स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याचे श्रेय शिक्षणापेक्षा त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंसांना आहे.[२] परमहंसाच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेनुसार सेवाकार्य करण्यासाठी व त्यांचा संदेश देशाच्या कानाकोप-यात पोचविण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. १८८८साली स्वामी विवेकानंदांनी संन्यासाची दिक्षा घेतली. भारतातील सामाजिक स्थितीचे जवळून अवलोकन करण्यासाठी इ.स. १८८८ ते १८९१ या कालखंडात त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला. त्याचप्रमाणे चीन, जपान, श्रीलंका आणि कॅनडा या देशांना भेटी दिल्या. ११ सप्टेंबर १८९३ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत त्यांनी वेदांत तत्वज्ञान व हिंदू धर्माची सर्वसमावेशकता या विषयावर आपले परखड विचार मांडले. आपल्या तत्वज्ञानाच्या व विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी

मठ स्थापन केले व रामकृष्ण सेवा संघाची स्थापना केली. वयाच्या अवघ्या चाळीसाव्या वर्षी ४ जूलै १९०२ साली त्यांना देवाज्ञा झाली.[३]

**स्वामी विवेकानंदाचे शैक्षणिक विचार :**

स्वामी विवेकानंद हे पाश्चिमात्य शिक्षण पध्दतीतून तयार झालेले आंग्लविद्याभुषित पदवीधर होते. भारत गुलामगिरीचे जीवन जगत असतांना सर्वसामान्य जनतेला शिक्षणच तारु शकेल अशी त्यांची भूमिका होती. शिक्षणात अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय असावा असे सर्वप्रथम त्यांनीच प्रतिपादन केले. विवेकानंदांना अभिप्रेत असलेले शिक्षण केवळ पुस्तकी व माहिती संकलित करणारे शिक्षण नाही. तर प्रत्येक समस्या लीलया सोडवणारे खरेखुरे शिक्षण अभिप्रेत आहे. जे शिक्षण माणसाला परिपूर्णतेकडे घेऊन जाते, त्याच्या ठायी आदर्शवाद, सारासार बुध्दी व उत्तम चारित्र्य निर्माण करते ; जे त्याला आत्मज्ञान देऊन त्याच्या जीवात्म्यातच अव्यक्त स्वरुपात वावरणा-या अनंत शक्तींना जागे करते ते खरे शिक्षण होय. असे शिक्षणच इच्छा शक्तीला योग्य ते वळण देऊन सर्व मानसिक शक्तीचा अनुरुप विकास घडूवन आणू शकते अशा शिक्षणाची त्या काळी जनतेला गरज होती, असे स्वामी विवेकानंदाचे मत होते. शिक्षणाबद्दल विचार व्यक्त करतांना पुढे ते म्हणतात. भारताचा जो सत्यानाश झाला आहे त्याचे मूळ कारण म्हणजे, 'राजसत्ता व वर्णाभिमान यांच्या जोरावर देशातील समस्त विद्याबुध्दी काही मूठभर लोकांमध्ये डांबून ठेवणे हे होय.'[४]

ज्ञान हे मानवाच्या अंतर्गत असते पण ते सुप्तावस्थेत असते. ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक वातावरण निर्माण करुन दिले की, अज्ञानाचे पटल दूर होऊन ज्ञानाची प्राप्ती होते. शिक्षण म्हणजे नैसर्गिक विकास होय. ती एक स्वाभाविक प्रक्रिया असते असे स्वामी विवेकानंद म्हणतात.

**शिक्षणाचे ध्येय / उद्देश :**

माणूस घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय असले पाहिजे असे स्वामींचे मत आहे. शिक्षणाचा उद्देश माणसातील पूर्णत्वाचा विकास करणे होय. शिक्षणाने व्यक्तीचा आत्मविकास साधण्यासाठी इच्छाशक्तीचा विकास करुन तिचा वापर करणे क्रमप्राप्त ठरते. उच्च दर्जाची राष्ट्रभक्ती ह शिक्षणाचे दुसरे ध्येय असावे असे स्वामी विवेकानंदांना वाटते. अध्ययन म्हणजे केवळ माहिती गोळा करणे नव्हे तर मनाची एकाग्रता साध्य करण्याचे साधन होय. नितिशास्त्र, धर्म आणि नैतिक मूल्य यांच्या एकीकरणासाठी शिक्षण आवश्यक असते.[५]

स्वामी विवेकानंदांनी धार्मिक विकासाला शिक्षणाचे मूख्य ध्येय मानले आहे. धर्म हा शिक्षणाचा आत्मा आहे असे ते म्हणतात. विद्यार्थ्यांमध्ये विश्वबंधूत्व व समाजसेवेची भावना विकसित करण्यासाठी शिक्षण सहाय्यभूत ठरते. माणसाचा शारीरिक तसेच मानसिक विकास केवळ शिक्षणामुळेच शक्य होतो. शिक्षणाचे अंतिम ध्येय म्हणजे आत्मसाक्षात्मकार होय. म्हणून विद्यार्थ्यास आत्मसाक्षात्कारासाठी शिक्षण देणे आवश्यक ठरते.

**स्त्री शिक्षण विषयक भूमिका :**

स्त्रीला विश्वातील सर्वव्यापी शक्तींचा आविष्कार समजले जाते. सर्वव्यापी शक्ती म्हणजे स्त्री होय अशी स्वामींजींची देखील धारणा होती. 'एखाद्या देशात स्त्रियांना ज्या रितीने वागवले जाते त्यावरुन त्या देशाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते' असे स्वामी विवेकानंदांचे मत होते. म्हणूनच विवेकानंदांनी स्त्री शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले. स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या देशाच्या प्रगतीला हातभार लावतील, सक्षम होतील. शिक्षणाशिवाय स्त्रियांची उन्नती होणर नाही या मतांचा त्यांनी वेळोवेळी पुनरुच्चार केला. स्त्रिया स्वावलंबी बनल्या पाहिजेत, धीट व निर्भय बनल्या पाहिजेत. त्यासाठी त्यांना इतिहास, पुराणे, गृहव्यवस्था, विविध कला, धर्म व चारित्र्य संवर्धक ज्ञान यायला हवे असे ते म्हणतात. शिक्षित स्त्रियांच्या घरातच थोर पुरुषांचा जन्म होतो यावर त्यांचा विश्वास होता.

**सारांश :**

अशा प्रकारे स्वामी विवेकानंदांचे विचार सर्वसमावेश आहेत. भारतीय आणि पाश्चात्य तत्वज्ञानाचा त्यांनी निरीक्षणात्मक अभ्यास केला व त्यातून चांगले ते निवडून दोन्हींचा समन्वय साधून आपले शैक्षणिक तत्वज्ञान मांडले. अध्यात्म आणि विज्ञान यांची सुरेख सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांच्या विचारात दिसतो. धार्मिक आणि वैज्ञानिक तत्वज्ञानाचा समन्वय साधून आजच्या काळासाठी आवश्यक असणा-या आधुनिक शिक्षणाचा दृष्टीकोन त्यांच्या तत्वज्ञानातून स्पष्ट होतो.

**संदर्भ सूची**

१) स्वामी विवेकानंद यांचे चरित्र, सत्येंद्रनाथ मुजूमदार, रामकृष्ण मठ नागपूर, पृ. ७.
२) आधुनिक भारतातील राजकीय विचार, डॉ. भास्कर भोळे, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर, पृ.८६.
३) शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, डॉ. के.यु. घोरमोडे डॉ. कला घोरमोडे, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.६८.
४) स्वामी विवेकानंद ग्रंथावली, संपा.- स्वामी शितत्वानंद आणि स्वामी व्योमरुपानंद, रामकृष्ण आश्रम, नागपूर, खंड सातवा, पृ.२२०-२२.
५) शिक्षणशास्त्र, प्रा. के.व्ही. देवरे, निराली पब्लिशर्स, पुणे, पृ. ८-४.